# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे कक्ष

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर –०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :-१८२/२०२२ दिनांक :- १६/०६/२०२२

# क्रेडीट कार्डद्वारे फसवणूक झालेली रक्कम १,८३,०९५/- रुपये परत मिळविण्यात सायबर गुन्हे कक्षास यश !!!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत काशिमिरा पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे इसम श्री.मिलींद चौधरी यांचे स्टेट बँक ऑफ इंडीयाचे क्रेडीट कार्डवरुन १,८३,०९५/- रुपयाची फसवणूक झालेबाबत तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथील आवक अर्ज क्रमांक ३३९-बी/२०२२ दिनांक ०१/०४/२०२२ रोजी चौकशीकामी प्राप्त झाला होता.

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत त्यांचे बँकेकडून माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची फसवणूक रक्कम **IMMIGRATION CANADA ONL OTTAWA CA** यावर गेल्याचे निष्पन्न झाले. याबाबत तात्काळ स्टेट बँक ऑफ इंडीया बँकेसोबत पत्रव्यवहार करुन सदरचा व्यवहार हा (**Unsecured Transaction**) असल्याचे बँकेचे निदर्शनास आणून देण्यात आले तसेच बँकेकडे वेळोवळी पाठपूरावा करुन नमूद फसवणूक रक्कम थांबविण्यात आली. तसेच फसवणूक रक्कम दिनांक ०८/०६/२०२२ रोजी पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **अशा प्रकारे मेसेज प्राप्त होताच तात्काळ बँक व नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा.**
- **आपल्या मोबाईल मध्ये प्राप्त होणारे एसएमएस, ईमेल यात येणार बँकेचे (Unsecured Transaction) मेसेज तपासणी करावी.**
- **आपले मोबाईलवर प्राप्त होणारा OTP कुणालाही देवू नये.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास अथवा असे कृत्य कोणी इसम करीत असल्याचे आढळुन आल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोलीस अंमलदार /१२०९५ गणेश इलग, पोलीस अंमलदार/१२०९५ प्रविण आव्हाड, महीला पोलीस अंमलदार/ १३१०४ पल्लवी निकम यांनी पार पाडली आहे.

सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११ ०१३५
सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५

➢ सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

**----0000----**